| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 27 Aug 2024 | Home hospital services also save on healthcare costs | Kesari |

# घरातील रुग्णालय सेवेमुळे आरोग्यावरील खर्चही वाचतो

दरवर्षी वैद्यकीय खर्च वाढत चालला आहे. त्या पार्श्वभूमीवर रुग्णांची वैद्यकीय काळजी घेणे अवघड झाले. या पार्श्वभूमीवर सर्वकष आरोग्य विमा घेण्याचा निर्णय गंभीर ठरणार नाही. आरोग्य विषयक आणीबाणीच्या वेळी असा विमा आर्थिक चिंता दूर करतो. अनेकदा आपल्याबरोबरच ज्येष्ठ रुग्णाची काळजी घेण्याचे मोठे आव्हान असते. अनेकदा रुग्णांवर घरातच उपचार करण्याची वेळ येते. अनेक जण असा विचार करतात की आरोग्य विमा रुग्णालयांतील उपचारासाठी केवळ असतो. पण,अशा विम्याच्या माध्यमातून घरातच रुग्णावर उपचार करण्याची सुविधा दिली आहे. त्या माध्यमातून रुग्णाची घरातच रग्णालयासारखी काळजी अणि उपचार करता येतात. विशेषत: ज्येष्ठ नागरिकांची वैद्यकीय काळजी घेताना होणारा अफाट खर्च वाचतो. आता घरात रुग्णालय सेवेची कल्पना आणि त्याची व्याख्येबाबत पाहुया. ही सुविधा तुमच्या आणि तुमच्या जवळच्यांसाठी किती फायदेशीर आहे. त्याचा आढावा.

## घरात रुग्णालय सेवा म्हणजे काय ?

- वैद्यकीय उपचार घरातच घेता येणे म्हणजे रुग्णाला घरात रुग्णालयाप्रमाणे सेवा देणे होय. या माध्यमातून विमाधारकाला घरातच रुग्णालयाप्रमाणे उपचार करून घेता येतात.. अनेकदा गंभीर रुग्ण, अपघातातील जखमी झालेल्या व्यक्तीवर सातत्याने लक्ष ठेवावे लागते. मात्र, त्याला रुग्णालयात दाखल केल्यास मोठा खर्च होतो. अशा स्थितीत अंथरुणावर खिळलेला व्यक्ती घरातच वैद्यकीय सेवा घेऊ शकतो. त्यासाठी त्याला रुग्णालयात प्रवेश करावा लागत नाही. तसेच तेथे राहावेही लागत नाही. जे प्रदीर्घ काळ आजारी आहेत आणि ज्यांची काळजी वारंवार घ्यावी लागते, अशांसाठी हा विमा उपयुक्त आहे. त्यामध्ये रुग्णावर होणारा खर्च परत मिळतो, परिचारिकांकडून दिल्या जाणाऱ्या सेवेचा खर्च, सेवेसाठी वापरलेल्या वैद्यकीय उपकरणांचा आणि डॉक्टरांनी दिलेल्या चिठ्ठीतील औषधांच्या खर्च परत दिला जातो. या सेवेत रुग्णाची घरातच काळजी घेता येणे शक्य होते. अनेक नागरिकांनी रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेले असते. या वयात त्यांची वैद्यकीय काळजी घेण्याची गरज भासते. अर्थात घरात काळजी घेणे आणि घरात उपचार करणे यातील फरक महत्वाचा ठरतो.

## घरात काळजी आणि घरातील उपचारमधील फरक

- घरात रुग्णाची काळजी घेण्यामध्ये ताप किंवा फ्लू या आजाराचा समावेश असतो. औषधे घेतल्यानंतर काही दिवसांत रुग्ण बरा होतो. यानंतर तो कामावर जाणे आणि दैनंदिन कामे सहजपणे करू शकतो. त्यासाठी गहन वैद्यकीय हस्तक्षेपाची गरज नसते. या उलट घरातील उपचार पद्धतीत डॉक्टर स्वत: गंभीर रुग्णावर सातत्याने लक्ष ठेवत असतात. अनेकदा अशा उपचार पद्धतीची रुग्णांना गरजही असते.



**भास्कर नेरुरकर**
*प्रमुख, आरोग्य प्रशासन पथक*
*बजाज अलियांझ, जनरल इन्शुरन्स*

## गंभीर स्थिती

- जर रुग्ण गंभीर आजारी असेल आणि तो रुग्णालयात उपचार घेण्यासाठी हलू शकत नाही. अंथरुणावर खिळून असल्यामुळे त्याच्यावर घरात उपचार करणे आणि त्याची काळजी घेणे आवश्यक ठरते.

## रुग्णालयात पुरेशा वैद्यकीय सुविधा नसणे

- अनेकदा रुग्णांनी उपचारासाठी निवडलेल्या रुग्णालयात पुरेशा वैद्यकीय सुविधा नसतात. जशी खाट. अशा प्रकरणात रुग्णावर घरातच उपचार करणे हा एक पर्याय ठरतो.

## रुग्णालयात सातत्याने राहणे अडचणीचे

- काही रुग्णांना विविध कारणांमुळे रुग्णालयात सातत्याने राहाणे आवडत नाही किंवा ते त्यांच्यासाठी अडचणीचे ठरते. अशा वेळी वैयक्तिक कारणामुळे त्यांच्यावर दीर्घकाळ उपचाराची गरज असते. अनेकदा रुग्णाच्या कुटुंबीयांनी निवडलेले रुग्णालय दुसऱ्या शहरात किंवा एखाद्या मोठ्या शहरात असते. त्यामुळे रुग्णाबरोबरच कुटुंबीयांसाठी तेथे उपचार घेणे सोईचे ठरत नाही. कारण लांबचे अंतर आणि खर्चही आवाक्याबाहेर असतो. अशा वेळी घरात उपचार करून घेणे त्यांच्यासाठी फायदेशीर ठरते. विमा कवचाअंतर्गत घरात होणाऱ्या उपचाराचा खर्च दिला जातो. तसेच कॅशलेस सुविधा रुग्णालयाप्रमाणे दिली जाते. तसेच विमा धारकावर झालेला वैद्यकीय खर्चही विमा कंपनीकडून परत मिळतो.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी वरदान

- ज्येष्ठ नागरिकांसाठी घरातील उपचार पद्धती वरदान आहे. रुग्णालयात न जाता वैद्यकीय सेवा त्यांना प्राप्त होते. गंभीर आजाराने त्रस्त असलेल्यांना रुग्णालयात हलविण्याची गरज नसते. रुग्णाला घरातच रुग्णालयाप्रमाणे सर्व सुविधा मिळतात. तसेच डॉक्टर त्याच्या आरोग्याची काळजी घेत असतात. त्यामुळे रुग्णालयात जाण्यासाठी होणारा प्रवास खर्च वाचतो. रुग्ण कुटुंबीयाच्या सहवासात वैद्यकीय सेवा प्राप्त करत राहतो. त्यामुळे त्याचे मनोधैर्य वाढते. तसेच त्याच्यावर उपचार सहज होतात. घरातच रुग्णाची काळजी घेतली जात असते. त्यामुळे दीर्घकाळ रुग्णालयात त्याला राहावे लागत नाही. त्यामुळे त्याचा खर्चही वाचतो. त्यामुळे ज्येष्ठांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत मिळते.

## वैद्यकीय विम्यात काय आहे? काय नाही

- सर्वच वैद्यकीय विम्यात घरात उपचार करण्याची सुविधा दिली आहे. मात्र, त्यात काय सुविधा दिल्या जातात आणि काय दिल्या जात नाहीत ? याची काटेकोर तपासणी करणे आवश्यक आहे. एखादा रुग्ण अंथरुणाला खिळला असेल आणि तो रुग्णालयात जाण्यायोग्य नसतो किंवा त्याला रुग्णालयात खोली मिळाली नाही तर घरातच रुग्णालय सुविधा दिली जाते. ती तीन दिवसांपेक्षा अधिक दिवस मिळते.

काही विमा कंपन्या काही बाबी घरातील रुग्णालय विमा सेवेतून वगळतात. त्यामध्ये काही वेळा गरजेनुसार तीन दिवसांपेक्षा कमी दिवस उपचार सुविधा दिली जाते. या उलट संधीरोग, संधीवात, अस्थमा, मधुमेह, अपस्माराचा झटका आणि उच्च रक्तदाब आदी गंभीर आजारात दीर्घकाळ उपचार करावे लागतात.

ज्येष्ठ नागरिक आणि अन्य आरोग्य विमा याचा विचार केला तर त्यांच्यासाठी घरात रुग्णालय सेवा अधिक मौल्यवान ठरते. त्या माध्यमातून त्यांची घरातच वैद्यकीय काळजी दीर्घकाळ घेता येते. ती अतिशय सुविधाजनक आणि चांगले आयुष्य जगण्यासाठी उपयुक्त आहे.